# प्रकरण दुसरे

# प्रकरण २
# कागल तालुका सामाजिक व आर्थिक स्थिती आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे स्वरूप आणि कार्ये

## २.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे स्वरूप व कार्ये यांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये केंद्रीय पातळी ते स्थानिक पातळी पर्यंतचे सार्वजनिक वितरणाचे व्यवस्थापन आणि स्वरूपाविषयी माहिती प्राप्त केली आहे. त्याचबरोबर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत असलेल्या रेशन धान्य दुकानाचे परिक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्याचा विशेषतः कागल तालुक्याचा सामाजिक, अर्थिक व भौगोलिक परिसराचा अभ्यास करण्यात आला असून भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्याबरोबर त्याच्या स्वरूपाचा व कार्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे स्वरूप, कार्य व व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यात आला आहे.

मागील प्रकरणात सार्वजनिक वितरण व्यवस्थेची पार्श्वभूमी व गरज या दृष्टीने अभ्यास आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे अर्थव्यवस्थेतील स्थान महत्वाचे असून आवश्यक वस्तूंचा पुरवठा सर्वसामान्य लोकांना करण्याचे हे एक प्रभावी साधन आहे. मागासलेल्या घटकांचा विकास व प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्था महत्वाची आहे.

## २.२ सार्वजनिक वितरण व्यवस्थेत समाविष्ट वस्तू

लोकांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत

केला जातो. त्यामध्ये तांदूळ, गहू, डाळी, साखर, तेल, रॉकेल, कापड, साबण, आगपेटी, चहा इ. वस्तू सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविल्या जात असल्या तरी प्रादेशिकतेचा विचार करून प्राधान्य क्रमाने वस्तूंचा पुरवठा केला जातो. जसे की बंगाल व पश्चिम विभागात तांदूळ आणि देशाच्या मध्यवर्ती भागात गव्हाचे वाटप प्रामुख्याने केले जाते. काही ठिकाणी तांदूळ, गहू या दोन्ही वस्तू तर काही ठिकाणी बाजरी वैगेरे पुरविली जाते. त्याचबरोबर इतर वेळी एखाद्या वस्तूचे महत्व व गरज लक्षात घेऊन त्या त्या वस्तूचे वाटप केले जाते. सर्वसाधारणपणे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक वस्तू स्वस्त व गरिबांना परवडणाऱ्या दरात देण्याचे प्रमुख कार्य केले जाते. या दृष्टीने भारतीय अर्थव्यवस्थेतील तळापर्यंतच्या लोकांना आवश्यक वस्तू पुरविण्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका महत्वाची आहे.


## २.३ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत होणारा पुरवठा

राज्य व केंद्रीय पातळीवरून लोकांना आवश्यक असणाऱ्या वस्तूचे वाटप सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत केले जाते. अन्नधान्याच्या बाबतीत भारतीय अन्न महामंडळ (FCI) सार्वजनिक वितरण व्यवस्थेला मदत करते. तसेच साखरेच्या बाबतीत देखील भारतीय अन्नमहामंडळ सहकारी साखर कारखान्याच्या मार्फत पुरवठा करण्याचे कार्य करते. तसेच खाद्यतेलाच्या बाबतीत राज्य व्यापार महामंडळ जबाबदारी घेते. इंडियन ऑईल कार्पोरेशन, हिंदूस्थान पेट्रोलियम व भारत पेट्रोलियम इ. संस्थाच्या मार्फत रॉकेलचा पुरवठा सर्व भागात सार्वजनिक वितरण व्यवस्थेला केला जातो.

## २.४ सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे प्रशासन

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत कार्डधारकांना ज्या वस्तू पुरविल्या जातात त्याकरीता एक विशिष्ट प्रकारचे प्रशासन कार्यरत आहे. याचा उहापोह खालील तक्यावरून स्पष्ट केला गेला आहे.

## आकृती २.१ : सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे प्रशासन




ता.क.: शुभ्र कार्डधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अन्नधान्य वाटपातून वगळले आहे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वरील तक्त्यावरून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे प्रशासन कशा प्रकारे कार्य करते हे समजून येते याचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे –

१. भारतीय अन्न महामंडळ हे देशातील विविध ठिकाणाहून व विविध संस्थेमार्फत अन्नधान्याची बाजारभावाने खरेदी करून देशातील नागरीकांच्या अन्नसुरक्षितेसाठी संकलन करते. असे संकलीत अन्नधान्य राज्याची आर्थिक स्थिती, लोकसंख्येचे प्रमाण, दारिद्र्याचे प्रमाण, राज्यातील लोकसंख्येची गरज इ. निकष लावून अनुदानीत किंमतीत राज्य निहाय वाटप करते.

२. महाराष्ट्र राज्यात भारतीय अन्न महामडंळाकडून खरेदी केलेले अन्नधान्य विविध निकष लावून जिल्हा निहाय वाटप केले जाते. याच पद्धतीने कोल्हापूर जिल्ह्याला अन्नधान्याचा पुरवठा होतो.

३. कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे सार्वजनिक वितरणातील अन्नधान्य खरेदी करण्यासाठी डिमांड ड्राफ्ट काढून 'भारतीय खाद्य निगम, बांद्रा' यांच्याकडे पाठवितात. त्यानुसार 'भारतीय खाद्य निगम, पुणे' येथिल गोडावूनमधून कोल्हापूर जिल्ह्यासाठी अन्नधान्याची उचल केली जाते. हे उचल केलेले अन्नधान्य 'केंद्रीय वखार महामंडळ, मार्केट यार्ड, कोल्हापूर' याठिकाणी आणून ठेवले जाते.

४. कोल्हापूर जिल्ह्यातून तालुक्याची लोकसंख्या, वित्तीय स्थिती, दारिद्र्याचे प्रमाण इ. निकष लावून तालुका निहाय वाटप केले जाते. या पद्धतीने कागल तालुक्याला अन्नधान्याचा पुरवठा होतो. कागल तालुक्याचे तहसिलदार तालुक्यासाठी मंजूर झालेल्या अन्नधान्याची केंद्रीय वखार महामंडळ, मार्केड यार्ड येथून उचल करून शासकिय धान्य गोदाम कागल येथे ठेवले जाते. त्यानंर प्रत्येक गावातील रेशन धान्य दुकानदाराला मंजूर अन्नधान्याची किंमत ट्रेझरीमध्ये भरावी लागते व ती पावती घेऊन रेशन धान्य दुकानाचा व्यवस्थापक शासकिय गोदाम कागल येथून अन्नधान्याची उचल करतो. त्यानंतर हे उचल केलेले धान्य गावातील कार्डधारकांना त्यांच्या प्रकारानुसार वाटप करतो.

## २.५ सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे स्वरूप

सार्वजनिक वितरण व्यवस्था, राज्य व केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने चालविली जाते. केंद्र सरकार अन्नधान्याचा साठा करून योग्य त्या प्रमाणात राज्याराज्यात वितरीत करण्याचे कार्य करते. राज्य सरकार स्वस्त धान्य दुकानामार्फत दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना धान्य वाटप करण्याचे काम करते. या वाटपासाठी वेगवेगळ्या रंगाचे उदा. केसरी (APL), पिवळे (BPL), अंत्योदय (AN), व अन्नपूर्णा योजना कार्डधारकांना त्यांच्या कुटुंबातील संख्येनुसार धान्य वाटप करण्याचे कार्य केले जाते. एकूणच केंद्र सरकार राज्य सरकारला आवश्यक वस्तूंचा पुरवठा करते व प्रत्येक राज्य सरकारमार्फत जिल्हा पातळीवर वस्तू पाठविल्या जातात व तेथून त्या स्वस्त धान्य दुकानांमार्फत लोकांच्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले जाते. सरकार विविध माध्यमातून अन्नधान्य एकत्रित करून राज्य सरकारच्या विविध सहकारी व खाजगी संस्थाच्या माध्यमातून सामान्य ग्राहकांपर्यंत वस्तू पोहचविते. खाजगी आणि सरकारी स्वस्त धान्य दुकानांची संख्या जवळ जवळ ४.७८ लाख इतकी आहे.

गरजू कुटुंबांना योग्य रितीने अन्नधान्याचे वितरण करण्यासाठी माहाराष्ट्र शासनाने त्रिस्तरीय अन्नधान्य पुरवठा योजना (Three Tyre Supply Scheme) १ मे १९९४ पासून अमलात आणली आहे. व्यक्तीचे अन्न हा आधार मानून वेगवेगळ्या उत्पन्न गटातील लोकांना वेगवेगळ्या प्रकारचे रेशन कार्ड वितरीत केलेले आहे. जेणेकरून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व गरजू कुटुंबांना होईल. खालील दिलेल्या तक्त्यामध्ये उत्पन्नावर अधारित कार्ड प्रकार व महाराष्ट्रातील प्रत्येक कार्डधारकाची संख्या दर्शविलेली आहे.

## तक्ता २.१
## महाराष्ट्रातील उत्पनावर अधारित विविध कार्डधारकांची संख्या

| अ.क्र. | प्रकार | उत्पन्न मर्यादा (रुपये) | कार्डधारकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पिवळे (BPL) | १० ते १५००० | ७३,४०,६६० | ३१.३० |
| २ | केशरी (APL) | १५००० ते १००००० | १,५१,२६,५७४ | ६४.४९ |
| ३. | पांढरे | १००००० पेक्षा अधिक | ०९,८७,६१३ | ४.२१ |
| एकूण | | | २,३४,५४,८४७ | १००.०० |

संदर्भ : Economic Survey of Maharashtra 2006-07

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, केशरी कार्डधारकांची संख्या सर्वाधिक (६४.४९ %) असून बहुसंख्य लोकसंख्या १५००० ते १००००० उत्पन्नामध्ये समावलेली आहे. त्याच्या खालोखाल पिवळ्या कार्डधारकांची संख्या अधिक (३१.३० %) आहे. व त्यानंतर पांढऱ्या कार्डधारकांची संख्या (४.२१ %) आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी आहे. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की महाराष्ट्रातील अधिकांश लोकसंख्या ही दारिद्र्य रेषेच्या वरती आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत केल्या जात असलेल्या वस्तूंच्या किंमती भारत सरकार ठरविते. भारत सरकारने निर्माण केलेल्या कृषी मूल्य व खर्च आयोगामार्फत किमान आधार किंमत जाहीर केली जाते. या किंमतीचा आधार घेऊन शेतकरी आपले उत्पादन शासनाला विकतो. ज्यावेळी किमान अधारभूत किंमतीपेक्षा बाजारात कमी किंमत एखाद्या वस्तूला मिळत असेल तर सरकार धान्य खरेदी करण्याचे पाऊल उचलते आणि किमान हमी भावास अन्नधान्याची खरेदी केली जाते. त्या वस्तूंची किमान हमी भावाचा आधार घेऊन सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करता येणाऱ्या वस्तूंची किंमत निश्चित केली जाते.

सन १९८० च्या मध्यास काही राज्यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा ग्रामीण भागामध्ये विस्तार केला. तसेच तो सामाजिक कल्याणाचा कार्यक्रम

म्हणून अधिकाधिक अनुदान देऊन राबविला. सन १९८५ ला सुधारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था (RPDS – Revamped Public Distribution System) सुरू केली आणि जवळ जवळ ५७ द.ल. लोकांना या योजनेचा लाभ देणेत आला. तसेच ४.७८ लाख रेशन दुकानाद्वारे वार्षिक ३०००० कोटी रुपये वस्तूंचे वितरण करण्यात आले आहे.

### २.५.१ अंत्योदय योजना

गरिबातील गरीब व्यक्तीला/कुटुंबाला पुरेशा प्रमाणात अन्नधान्य मिळावे व त्यांना योग्य पद्धतीने जीवन जगता यावे यासाठी डिसेंबर २००० मध्ये अंत्योदय योजना आखण्यात आली. यामध्ये निराधार, अपंग, विधवा इ. व्यक्तींचा समावेश असतो. या योजनेअंतर्गत प्रत्येक कार्डधारकाला ३५ किलो अन्नधान्य वितरीत केले जाते. यामध्ये तांदूळ २ रु.किलो या दराने गहू ३ रु किलो अशा अल्प किंमतीत पुरविला जातो. या योजनेच्या लाभार्थींची संख्या जवळ जवळ ३.९० लाख असून लवकरच ती ५.२१ लाखापर्यंत पोहचेल असा अंदाज आहे.

### २.५.२ अन्नपूर्णा योजना

अलिकडील काळात नविन कायदा करून ६५ वर्षाच्या वरील व्यक्ती ज्या निराधार आहेत अशा व्यक्तींना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत धान्य पुरविण्यात येत आहे. या योजनेला अन्नपूर्णा योजना असे म्हणतात. या योजनेतून ६५ वर्षाच्या वरील निराधार व्यक्तींना १० किलो गहू मोफत दिला जातो.

## २.६ सार्वजनिक वितरण व्यवस्थेची कार्ये

अन्नधान्य वितरणासाठी व अर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याची समस्या सोडविण्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका महत्वाची आहे. सरकार स्वस्त धान्य दुकानामार्फत

मागासलेल्या लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करणेस त्या अन्नधान्यावरती मोठ्या प्रमाणात अनुदान देते. या अनुदानावरती होणारा खर्च देखील मोठा आहे. कारण शासन शेती हंगामा अगोदर किमान आधारभूत किंमत जाहीर करून बाजारातून अन्नधान्य खरेदी करते व त्या वरती अनुदान देऊन लोकांना कमी किंमतीत ते अन्नधान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविले जाते. अशा प्रकारे विविध कार्ये सार्वजनिक वितरण व्यवस्था पार पाडीत असते. काही मुख्य कार्ये पुढील प्रमाणे आहेत...

### २.६.१ आधार किंमत कार्यक्रम/अन्नधान्य खरेदी

सन १९६० मध्ये अन्नधान्य खरेदी साठा अपुरा असल्याने अन्नधान्याची उपलब्धता कमी झाली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आधार किंमत कार्यक्रम जाहीर केला. यामुळे शेतकऱ्यांना किमान किंमतीची हमी प्राप्त झाली. तसेच व्यापाऱ्याकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक कमी झाली आणि उत्पादन वाढीस चालना मिळाली. अशी आधार किंमत सार्वजनिक वितरण व्यवस्थेत मध्यवर्ती काम करणारी संस्था भारतीय अन्न महामंडळ हे जाहीर करते.

### २.६.२ जीवनावश्यक वस्तूंचे वितरण

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत जीवनावश्यक असणाऱ्या वस्तूंचे वाटप केले जाते. यामध्ये गहू, तांदूळ, पामतेल, साखर, चहा, डाळी, रॉकेल, आगपेटी इ. वस्तूंचा समावेश असतो. अशा वस्तू अनुदानीत किंमतीत समाजातील अर्थिक कमकुवत वर्गाला पुरविल्या जातात. यामुळे अशा लोकांचे जीवनमान सुधारून अर्थिक विकासात सामील करून घेता येते.

### २.६.३ पुरवठा कार्डांचे वाटप

देशातील अर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गासाठी योग्यरितीने अन्नधान्याचा पुरवठा व्हावा यासाठी विविध निकष लावून कार्डांची वर्गवारी करून कार्डांचे

वाटप केले जाते. यामुळे कोणत्या कार्डधारकाला किती प्रमाणात वस्तू पुरवठा केला जावा हे माहित होते. निकष उत्पादनाच्या आधारावर लावले गेले आहेत. अशा पद्धतीने पुरवठा कार्डांचे वाटप करणे हे सार्वजनिक वितरणातील महत्वाचे कार्य आहे. अशा कार्डाचा आधार घेऊन नागरीकांना शासनाच्या इतर योजनासाठी अर्ज करता येतो. अशा तऱ्हेने रेशन कार्ड हे कुटुंबाचा एक मोठा दिलासा असतो.

### २.६.४ अन्नधान्याची साठवणूक

शेतीच्या हंगामामध्ये आधार किंमतीद्वारे शेती माल खरेदी करून सार्वजनिक वितरणासाठी त्याची योग्यपद्धतीने साठवणूक करणे, अशा सोई अन्न महामंडळ, मध्यवर्ती गोदाम महामंडळ, राज्य गोदाम महामंडळ करीत असते. सध्या मध्यवर्ती गोदाम महामंडळाची राज्यात ४७० गोदामे असून त्यामध्ये ७ द.ल. टन माल साठविण्याची क्षमता आहे. तसेच राज्य महामंडळाच्या २००० गोदामामध्ये १० द.ल. टन साठा करण्याची क्षमता आहे. देशात २९७० शितगृहे असून त्याची माल साठवण क्षमता ८ द.ल. टन इतकी आहे.

### २.६.५ अन्नधान्याची वाहतुक

शेती हंगामात शेती माल खरेदी करून तो गोदामापर्यंत आणणे आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करणेसाठी तो रेशन दुकानापर्यंत पोहचवणे यासाठी वाहतुक करणे महत्वाचे असते. यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था महत्वाचे कार्य करते.

### २.६.६ सार्वजनिक वितरणातील सर्व घटकांमध्ये समन्वय व नियंत्रण ठेवणे

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे महत्वाचे कार्य म्हणजे वितरणातील सर्व घटक म्हणजे विविध महामंडळे, रेशन दुकान, कार्डधारक यांच्यामध्ये समन्वय

राखण्यास उत्तेजन देणे व सर्व घटकांवर नियंत्रण ठेवणे इ. कार्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेला करावी लागतात.

### २.६.७ इतर कार्ये

सार्वजनिक वितरण व्यवस्थेला वरील कार्याव्यतिरिक्त अन्नधान्याच्या वाढीसाठी पर्यायी कार्येही करावी लागतात. यामध्ये संशोधनास उत्तेजन देणे, शेतीसाठी वित्तपुरवठा करणे, सांख्यिकी माहिती गोळा करणे, कुक्कुट पालन, फळे व भाजीपाला, मासे, वराहपालन, इतर मांस इ. सहाय्यक अन्नाला उत्तेजन देणे. अन्नधान्याचा समतोल, उपभोगाची निश्चिती देऊन त्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे, अन्नधान्याच्या उत्पादन वाढीला चालना देणे, किंमतीवर नियंत्रण ठेवणे, प्रक्रिया उद्योगाची स्थापना करणे, जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा वाटपाचे काम हाती घेणे इ. कार्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेला करावी लागतात.


## २.७ कोल्हापूर जिल्हा आणि कागल तालुक्याची सर्वसाधारण माहिती

### २.७.१ प्रस्तावना

कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडील नैऋत्य पठारी भागावर उत्तर अक्षांशावर १५° ते १७° व पूर्व रेखांशावर ७३° ते ७४° दरम्यान वसला असून जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या कडा, उत्तरेस वारणा नदी, पूर्वेस कृष्णा नदी व दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हा असून जिल्ह्यतील बहुतांश भागातील समुद्रसपाटीपासूनची उंची ३९० ते ६०० मी इतकी आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र २००३-०४ च्या आकडेवारीनुसार ७.७४६ चौ.कि.मी. इतके आहे. कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. जिल्ह्यात एक महानगरपालिका व ८ नगरपालिका कार्य करीत आहेत (आकृती २.२).

### २.७.२ कोल्हापूर जिल्हा अर्थिक पार्श्वभूमी

कोल्हापूर जिल्ह्याची अर्थिक पार्श्वभूमी समजून घेत असताना त्यामध्ये


कोल्हापूर जिल्हा
तालुका सीमा
जिल्हा सीमा
राज्य सीमा
तालुका मुख्यालय
N
W
E
S
50
0
50
Meters
अभ्यास क्षेत्र

आकृती २.२

बऱ्याच बाबींचा समावेश केला जातो. विशेषकरून कोल्हापूर जिल्ह्यातील नद्या, पर्जन्य, हवामान, लोकसंख्या इ. अशा अनेक गोष्टींचा अभ्यास केला जातो.

### २.७.२.१ पर्जन्य व हवामान

कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील सह्याद्री पर्वतरांगामध्ये दाट झाडी असून तेथे पर्जन्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे तेथिल हवामान थंड आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडे पर्जन्याचे प्रमाण कमी कमी होत जाते. त्यामुळे पश्चिमेकडील गगन बावडा, राधानगरी, चंदगड व आजरा या तालुक्यात पर्जन्यमान जास्त तर पूर्वेकडील शिरोळ व हातकणंगले तालुक्यात पर्जन्य प्रमाण कमी आढळते. सन २००२ मध्ये सर्वात जास्त म्हणजे ५४२६ मि.मी. पाऊस गगन बावडा तालुक्यात तर सर्वात कमी ४९३ मि.मी. पाऊस हातकणंगले तालुक्यात झाला आहे. २००४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात २१६० मि.मी. इतका पाऊस झाला.

### २.७.२.२ प्रमुख नद्या

जिल्ह्यातून प्रामुख्याने वारणा, पंचगंगा, दुधगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी व घटप्रभा या नद्या वाहतात. कृष्णा नदी जिल्ह्याच्या ईशान्य सीमेवरून तर वारणा, पंचगंगा, दुधगंगा आणि हिरण्यकेशी या नद्या वायव्येकडून आग्नेयकडे वाहतात. वारणा नदी सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या सीमेवरून १२० कि.मी. वाहते. तसेच जिल्ह्यातील कासारी, कुंभी, तुळशी व भोगावती या उपनद्या पंचगंगा नदीस मिळाल्या आहेत. दक्षिण भागात दूधगंगा ही प्रमुख नदी असून वेदगंगा ही तिची उपनदी आहे. पंचगंगा नदी ही नृसिंहवाडी जवळ कृष्णा नदीस मिळते. या नद्यांनी आपल्या आजूबाजूचा भाग सुपिक बनविला आहे.

### २.७.२.३ राज्य महामार्ग

राज्य महामार्ग हे राष्ट्रीय महामार्गाला जोडलेले असतात. शिवाय

राज्यातील महत्वाची ठिकाणे, जिल्हा मुख्यालये, महत्वाच्या बाजारपेठा, औद्योगिक केंद्रे, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यांना जोडलेले असतात. काही प्रमुख जिल्हा मार्गांना नुकताच राज्य महामार्गांचा दर्जा देण्यात आल्यामुळे ते अजून डांबरी करण्यात आलेले नाहीत. रस्ते विकास योजनेनुसार ते रस्ते डांबरी करण्याचे काम चालू आहे. शहर व सभोवतालच्या भागाचा विकास, वाढती लोकसंख्या व वाढता विस्तार लक्षात घेता महाराष्ट्र परिवहन महामंडळाद्वारे १९४८ मध्ये परिवहन व्यवस्था सुरू करण्यात आली.

### २.७.२.४ वहातुक व दळणवळण

दळणवळण साधनांचा अर्थिक जीवनावर फार मोठा परिणाम होतो. विविध ठिकाणांच्या अर्थिक गरजांची पूर्तता त्याचप्रमाणे अर्थिक विकास या साधनामुळे सुलभ होतो. अर्थिक विकासाची असमोतलता नष्ट करण्यासाठी व प्रादेशिक तसेच राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्याच्या कामीही याचा सिंहाचा वाटा असतो. सन २००२-०३ अखेर जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी ८७५७ कि.मी होती. त्यापैकी ४४६५ कि.मी. डांबरी, १९१६ कि.मी. खडीचे व २३७६ कि.मी. मुरमाचे रस्ते होते. जिल्ह्यातील रेल्वेमार्गांची लांबी ३७.६८ कि.मी. असून ६ रेल्वे स्थानके आहेत.

- रस्त्यांनी जोडलेली गावे १. बारमाही - १००३ २. हंगामी - १२०
- एकूण रस्त्यांची लांबी - ८७५७ कि.मी.
- राष्ट्रीय महामार्गांची लांबी - ६४ कि.मी.
- राज्य महामार्गांची लांबी - ८१४ कि.मी.
- जिल्हा रस्त्यांची लांबी - २०४५ कि.मी.
- ग्रामीण रस्त्यांची लांबी - ३१८१ कि.मी.

### २.७.२.५ प्रमुख उद्योगधंदे

कोल्हापूर जिल्हा औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्हा असून औद्योगिकरणात आवश्यक असलेल्या वहातुक व दळणवळणच्या सुविधा उपलब्ध आहेत.

जिल्ह्यात कोल्हापूर, कागल व इचलकरंजी येथे मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झालेले आहे. इचलकरंजी हे कापड निर्मितीचे केंद्र असून कागलमध्ये पंचतारांकित औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात आली आहे. कोल्हापूर येथे ऑईल इंजिन्स, कृषी अवजारे, यंत्रमाग, हातमाग, कुटीर उद्योग कार्यरत आहेत. जिल्ह्यात शिरोली, गोकूळ शिरगांव, इचलकरंजी, जयसिंगपूर व कोल्हापूरातील उद्यमनगर येथे औद्योगिक वसाहती स्थापन झाल्या असून हुपरी येथे सोन्याचांदीचे दागिने मोठ्या प्रमाणात करण्यात येत असल्याने तेथे ही औद्योगिक वसाहत स्थापन केली आहे. जिल्ह्यात एकूण १७ सहकारी साखर कारखाने कार्यरत असून २००२–०३ मध्ये ९६.२४ लाख टन ऊसाचे गाळप करून ११.८८ लाख टन साखर उत्पादन झाले आहे.

### २.७.२.६ बँकिग व्यवस्था

जिल्ह्यात २००२-०३ अखेरीस सहकारी, व्यापारी व राष्ट्रीयीकृत बँकांची ४४५ कार्यालये कार्यरत होती. राष्ट्रीयीकृत व सहकारी ८१ बँकाच्या २१९ शाखांपैकी सर्वाधिक शाखा करवीर तालुक्यात; तर सर्वात कमी शाखा गगन बावडा तालुक्यात होत्या. एकूण २२६ सहकार बँकापैकी ४० (१७.७० %) करवीर तालुक्यात होत्या.

### २.७.२.७ व्यापार व वाणिज्य

भौगोलिकदृष्ट्या विचार करता जिल्ह्याच्या पश्चिम व दक्षिण भागात लोहमार्ग टाकणे व रस्ते बांधणे फारच खर्चाचे असल्याने जिल्ह्याच्या पूर्व व मध्यम भागातच रस्त्यांचा अधिक विकास झाला आहे. जिल्ह्यातील व्यापारी वहातुक लोहमार्गापेक्षा रस्त्यांद्वारेच अधिक होत असते. पुणे–बेंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग (NH-4) प्रवासी व मालवाहतुकीच्या दृष्टीने अंत्यत महत्वाचा आहे.

जिल्ह्याच्या औद्योगिक व कृषी विकासाबरोबरच आयात व निर्यातीचा आकृतीबंध सुद्धा बदलत गेला आहे. सध्या मानवनिर्मित कापड कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री कच्चा माल, अधुनिक कृषी अवजारे, औषधे व

किटकनाशके, बांधकामसाहित्य, रासायनिक खत इ. माल देशातील विविध केंद्राकडून आयात केला जातो. निर्यातीमध्ये प्रामुख्याने गुळ, साखर, मिरची, तंबाखू, गोडेतेल, इचलकरंजीच्या साड्या, डिझेल व इलेक्ट्रीक पंप, मोपेड, कृषी अवजारे व धान्ये यांचा समावेश होतो.

### २.७.२.८ शिक्षण व्यवस्था

शिक्षण क्षेत्रात कोल्हापूरने बरीच प्रगती केली आहे. जिल्ह्यात अनेक प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच कला, वाणिज्य, शास्त्र, वैद्यकिय, कृषी व तंत्रज्ञान या विद्याशाखेतील उच्चशिक्षण देणारी अनेक महाविद्यालये आहेत. कोल्हापूरचे शिक्षण क्षेत्रातील स्थान लक्षात घेऊन शासनाने १९६२ मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली. सन २००१-०२ मध्ये जिल्ह्यात २०५४ प्राथमिक, ५८५ माध्यमिक, ११२ उच्च माध्यमिक शाळा व ७८ सामान्य महाविद्यालये होती. तसेच सन २००१-०२ मध्ये ८.९४ लाख विद्यार्थी शिक्षण घेत होते.

### २.७.२.९ सहकारी संस्था

महाराष्ट्रात सहकारी चळवळीच्या विकासामध्ये कोल्हापूर जिल्हा अग्रेसर आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून सहकारी संस्थाचा उल्लेख करावा लागेल. सन २००२-०३ अखेर जिल्ह्यात एकूण १०५१८ सहकारी संस्था होत्या. एकूण सहकारी संस्थापैकी १५ टक्के कृषी पतसंस्था, २६ टक्के बिगर कृषी पतसंस्था आहेत. जिल्ह्यातील कर्मचारी व नागरी सहकारी पतसंस्थाची टक्केवारी २६ इतकी होती.

### २.७.२.१० वैद्यकिय व सार्वजनिक आरोग्य

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २० रुग्णालये असून ग्रामीण रुग्णालये १५ तर ७२ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. तसेच ४ प्रसूतीगृहे देखील आहेत. त्याचबरोबर

कोल्हापूर जिल्ह्यात दोन वैद्यकिय महाविद्यालये आहेत. याशिवाय आर्युवेद महाविद्यालये ही काम करीत आहेत.

### २.७.२.११ लोकसंख्या

इ.स. २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यात नववा क्रमांक लागतो. २००१ जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्ह्याची लोकसंख्या ३५,२३,१३२ इतकी होती. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी सर्वात जास्त म्हणजे २६ टक्के इतकी करवीर तालुक्यात तर सर्वात कमी लोकसंख्या गगन बावडा तालुक्यात आहे. सन १९९१ ते २००१ च्या काळातील लोकसंख्येच्या वाढीचा वेग ग्रामीण भागात कमी दिसतो. याउलट नागरी भागात हा वेग वाढल्याचे दिसून येते.

## २.८ कागल तालुक्याचा अभ्यास

### २.८.१ कागल तालुका

कोल्हापूर जिल्ह्याच्या पूर्वेला वसलेला हा एक तालुका आहे. कागज हे तालुक्याचे ठिकाण पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापूरच्या आग्नेयेस १८ कि.मी. व दुधगंगा नदीपात्रापासून २ कि.मी. उत्तरेस आहे. या ठिकाणी नगरपालिका, दोन प्राथमिक विद्यालये व एक जुना भूईकोट किल्ला आहे. येथिल वाडा प्रेक्षणिय असून हातमागावर कापड विणणे, विटा तयार करणे, चांदीचे जिन्नस तयार करणे इ. घरगुती उद्योगधंदे चालतात. कागल तालुक्यामध्ये ८६ खेडी असून कागल व मुरगुड ही दोन छोटी शहरे आहेत. येथे भात व ऊस ही प्रमुख पिके घेतली जातात (आकृती २.३).

### २.८.२ भौगोलिक क्षेत्र

कोल्हापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र हे ७७४६ चौ.कि.मी. असून त्यापैकी कागल तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र हे ५४७५४ हेक्टर इतके आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## २.८.३ लोकसंख्या

२००१ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्ह्याची लोकसंख्या ३५,१५,४१३ होती. त्यापैकी १०,४२,१६२ नागरी व २४,७३,२५१ ग्रामीण लोकसंख्या होती. तसेच कागल तालुक्याची लोकसंख्या २,५९,८७७ असून त्यापैकी २,२५,२८३ इतकी लोकसंख्या (८६.० %) ग्रामीण भागात तर ३४,५९५ (१४.० %) इतकी लोकसंख्या नागरी भागात रहाते.

## २.८.४ ग्रामपंचायती

ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी ग्रामपंचायतींची भूमिका महत्वाची आहे. कोल्हापूर जिल्ह्यात १०२६ ग्रामपंचायती असून कागल तालुक्यात ८३ (८.० %) ग्रामपंचायती आहेत. 'ग्रामस्वच्छता अभियान' यामध्ये भाग घेऊन 'जैन्याळ' या ग्रामपंचायतीने विभागीय पातळीवर तृतीय क्रमांक पटकावला आहे.

## २.८.५ पिकाखालील क्षेत्र

कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण भौगोलिक क्षेत्राचा अभ्यास करत असताना एकूण पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कागल तालुक्यामध्ये २००६-०७ मध्ये ५४५५५ क्षेत्र पिकाखाली होते.

## २.८.६ पिकांचा आकृतीबंध

कागल तालुक्यतील प्रमुख पिकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. अन्न पिके

अ) तृणधान्ये : बाजरी, ज्वारी, गहू


ब) डाळी : हरभरा, तूर, मूग

क) तेलबिया : भूईमूग, एरंड, सरकी, सूर्यफूल

ड) भाजीपाला व फळे : मेथी, पोकळा, राजगिरा

२. बिगर अन्नधान्ये पिके/नगदी पिके

तंबाखू, कापूस, ऊस इ.


महाराष्ट्र
कागल तालुका
कोल्हापूर जिल्हा
Km 2 0 2 4 6 8 10 Km
कागल
तालुका हातकणंगले
ता लु का आ ज रा
उ
1 व्हन्नुर
2 क. सांगाव
3 मौ. सांगाव
4 सिद्धनेर्ली
5 वंदूर
6 शंकरवाडी
7 बामणी
8 व्हनाळी
9 बाचणी
10 केबंळी
राज्य सीमा
तालुका सीमा
तालुका मुख्यालय
सर्वेक्षणासाठी निवडलेले गांव

आकृती २.३

## २.८.७ पर्जन्यमान

२००६-०७ मध्ये कागल तालुक्यातील पर्जन्याचे एकूण दिवस ७१ होते. तर पर्जन्य १२५८.६० मि.मी. झाले. सरासरी तुलनेत पर्जन्याची टक्केवारी १५६.४१ आहे. या वर्षात जास्त पर्जन्यवृष्टी होऊन अनेक नद्यांना पूर आले होते.

## २.८.८ महत्वाच्या नद्या

कोल्हापूर जिल्ह्यातील प्रमुख नद्यामध्ये कृष्णा, पंचगंगा, वारणा, दुधगंगा व हिरण्यकेशी या नद्यांचा समावेश होतो. या मोठ्या नद्यांनी व त्यांच्या उपनद्यांनी जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी आपला परिसर सुपिक केला आहे. कागल तालुक्यामध्ये वेदगंगा, दुधगंगा, चिकोत्रा या तिन नद्यांनी व काळमावाडी धरणाने हा प्रदेश जास्तितजास्त ओलीताखाली आणण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.८.९ सहकारी संस्था, प्राथमिक कृषी सहकारी संस्था, साखर कारखाने, सहकारी दुधसंस्था

'सहकार' याचा अर्थ सर्वांनी एकत्र येऊन परस्परांना सहाकार्य करणे. भरतात शेकडो वर्ष कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या ग्रमीण शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी १९०४ मध्ये कायद्यान्वये सहकाराचा अवलंब करण्यात आला. भारत हा खेड्यांचा देश असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या विविध गरजांची पूर्तता करण्यासाठी प्राथमिक शेती सहकारी संस्था आधारभूत मानल्या जातात. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अशा संस्थांची संख्या १६८८ इतकी होती, त्यापैकी कागलमध्ये या संस्था १५४ इतक्या होत्या. तसेच कागल तालुक्यातील प्राथमिक पणन संस्थांची संख्या १३ आहे. २००६-०७ मध्ये दुग्ध सहकारी संस्थांची संख्या ३५१ असून एकूण सभासद संख्या ३१४७० होती. शीतगृहांची संख्या फक्त 1 होती.

## २.८.१० उद्योगसंस्था व कारखाने

औद्योगिक विकासावर देशाचा विकास अवलंबून असतो. उद्योग ही विकासाची जननी आहे. कोल्हापूर जिल्हा औद्यागिकदृष्ट्या सधन आहे. इ.स. १९३२ मध्ये कोल्हापूर येथे खाजगी क्षेत्रात कोल्हापूर शुगर मिल्स लिमिटेड नावाच्या अधुनिक पद्धतीच्या पहिल्या कारखान्याची स्थापना झाली. कागल तालुक्यात ऊसाची मुबलकता व ऊसापासून मिळणाऱ्या साखर कारखान्यांच्या स्थापनेस चालना मिळाली अशा पद्धतीने कागल तालुक्यात एकूण ३ साखर कारखाने आहेत. त्यापैकी कागल येथिल श्री शाहू सहकारी साखर कारखाना देशात अग्रेसर आहे.

## २.८.११ औद्योगिक वसाहती

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १६ औद्योगिक वसाहती असून कागलमध्ये १ औद्योगिक वसाहत आहे. ती आता पंचतारांकित औद्योगिक वसाहत म्हणून उदयास आली आहे. यास पंचतारांकित वसाहतीमध्ये अनेक उद्योग स्थापन झाले आहेत. काही उद्योग वसहातीमध्ये येण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळत आहे.

## २.८.१२ सामाजिक सेवा संस्था

सामाजिक सेवा याचा अर्थ समाजाला उपयोगी पडणाऱ्या संस्था, त्यामध्ये आरोग्य, शिक्षण, परिवहन सेवा अशा अनेक सेवा असतात. पण आपण या ठिकाणी मुख्यत्वेकरून परिवहन सेवेचाच विचार करणार आहोत. परिवहन सेवा संस्था ह्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ७४ असून कागलमध्ये त्यांची संख्या २ आहे. त्यापैकी एक कागल व दुसरी मुरगुड या ठिकाणी आहे.

## २.८.१३ शिक्षण संस्था

तक्ता २.२
कागल तालुक्यातील शिक्षण संस्था

| शिक्षण संस्था | कोल्हापूर जिल्हा | | कागल तालुका | |
|---|---|---|---|---|
| | २००३–०४ | २००४–०५ | २००३–०४ | २००४–०५ |
| प्राथमिक शाळा | २११६ | २१२७ | ११७ | १२१ |
| माध्यमिक शाळा | ७४१ | ७७३ | ५७ | ६२ |
| उच्च माध्यमिक | ३.७१ | ३.७१ | ३.७१ | ३.७१ |
| महाविद्यालये | ५५ | ५५ | ४ | ४ |

## २.८.१४ आरोग्य सुविधा

कागल तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे ५ आहेत. तर ग्रामीण रुग्णालयांची संख्या २ आहे.

## २.८.१५ रेशन दुकाने व लाभार्थी लोकसंख्या

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सध्या एकूण रेशन धान्य दुकाने १४०१ आहेत. त्यापैकी कागल तालुक्यात एकूण रेशन धान्य दुकाने ९४ (६.७० %) आहेत. त्यामध्ये शुभ्र कार्ड धारक १०१५, पिवळे कार्डधारक १६२१०, अंत्योदय कार्डधारक ४५४२, अन्नपूर्णा कार्डधारक २४ आणि केशरी कार्डधारक ३४४२५ इतके आहेत. तर कागल तालुक्यामध्ये एकूण लाभार्थी ५६२१६ इतके आहेत.

## २.९ सारांश

अशा पद्धतीने कोल्हापूर जिल्हा व कागल तालुक्याचा सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक व आर्थिक आराखडा इतर तालुक्याप्रमाणेच ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आधारीत वाटतो.